Pune Police

## प्रेस नोट दिनांक ०४/१२/२०१७

# दोन मांडूळाची तस्करी करणारे युनिट १, गुन्हे शाखा, पुणे शहरचे जाळयात

युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी गुन्हे प्रतिबंधात्मक कारवाई करणेकामी पेट्रोलींग फिरत असतांना पो.ना.श्रीकांत वाघवले व इरफान मोमिन यांना त्यांचे गुप्त बातमी दारामार्फत बातमी मिळाली की, दोन इसम कात्रज परीसरात दोन मांडूळ जातीचे साप विक्री करणेसाठी येणार आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळालेने सदर बातमी त्यांनी पो. उप निरीक्षक हर्षल कदम यांना कळविली असता, त्यांनी सदर बातमी वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री नितीन भोसले पाटील यांना कळविली असता, त्यांनी कायदेशीर कारवाई करणेचे आदेश दिलेने, सदर बातमीचे अनुषंगाने पोउपनिरी कदम यांनी वनविभाग, पुणे यांचे कडील महिला वनरक्षक स्वाती खेडकर व वनसेवक संभाजी धनावडे यांना कळवून त्यांना कात्रज येथे बोलवून, बातमी प्रमाणे खात्री करून युनिट १ कडील स्टाफ सह कात्रज चौकात छापा टाकला असता, दोन इसम काळया रंगाच्या सॅकमध्ये दोन मांडूळ जातीचे साप विक्री करणेसाठी आले असतांना मिळून आले. त्यांना त्यांचे नावं पत्ता विचारता त्यांनी आपले नांव १) गणेश सुभाष वाफगांवकर, वय १८ वर्षे, रा. नसरापूर ता. भोर, जि. पुणे २) राजू बबन शिळीमकर, वय ४० वर्षे, रा. मु.पो. कुरंगवळी, ता. भोर, जि. पुणे असे असलेचे सांगितले.

त्यांना सदर मांडूळांबाबत विचारणा केली असता, त्यांनी सदर मांडूळे ही विक्री करावयाची असून, ती अमावस्याच्या दिवशी घरात ठेवल्यामुळे धनप्राप्ती होते, तसेच जमिनीमध्ये दडवून ठेवलेले गुप्तधन बाहेर येते अशी अंधश्रध्दा आहे. सदर मांडूळाची मार्केटमध्ये ५०,००,०००/- (पन्नास लाख रुपये किंमत आहे).

वरील नमुद आरोपीतांकडुन १ किलो ५०० ग्रॅम वजनाचे व १ किलो ४०० ग्रॅम वजनाचे दोन मांडुळ त्यांची अंदाजे एकुण ५०,००,०००/- रु कि चे असे दोन मांडुळ ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे साो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे साो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख साो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ व श्री संजय निकम साो,सहा.पोलीस आयुक्त साो,गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक हर्षल कदम, पो उप निरी दिनेश पाटील, पो.ना.श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, इफ्रान शेख, सचिन जाधव, तुषार खडके, पो.हवा. रिजवान जिनेडी, उमेश काटे, प्रकाश लोखंडे, राजू पवार, अशोक माने, महेबुब मोकाशी, स.पो.फौज. राजाराम सुर्वे, सुभाष पिंगळे गजानन सोनुने, प्रशांत गायकवाड, मोहन येलपले, यांनी केली आहे.



